# कृषि उत्पन्न बाजार समिती, अहेरी ता. अहेरी जि.गडचिरोली

## -: शुध्दीपत्रक :-

सांख्यिकी यापदाचे वेतन श्रेणी हे दिनांक १३/०५/२०२५ च्या जाहीरातीत चुकीचे वेतन श्रेणी देण्यात आले असल्यामुळे, सदर पदाचे खालीलप्रमाणे वेतन श्रेणी लागु राहील याची उमेदवाराने नोंद घ्यावे.

| अ. क्र. | पदाचे नाव | चुकलेले वेतन श्रेणी | दुरूस्ती वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | सांख्यिकी | ३८६००-१२२८०० | ३५४००-११२४०० |

## - जाहिरात –

कृषि उत्पन्न बाजार समिती अहेरी मध्ये रिक्त असलेल्या पदांची सरळसेवा भरतीची प्रक्रिया पार पाडली होती, परंतु काही तांत्रिक कारणास्तव परिक्षा पुढे ढकल्यात आलेली होती. सदर परिक्षा दिनांक ११/०१/२०२६ रोज रविवारला घेण्यात येणार आहे.

तरी परिक्षेचे स्थळ व वेळ हे आपल्या प्रवेश पत्रात नमुद असेल.

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवारास लेखी परीक्षेकरीता स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

२) परीक्षा कक्षातील गैरवर्तवणुक, परीक्षेचे वेळी नक्कल (Copy) करणे, वशीला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांचे गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परिक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे, इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

३) परिक्षेच्या वेळेत किंवा एकुण निवड प्रक्रिये दरम्यान जर उमेदवाराने अनुचित प्रकार करणे किंवा तोतयागिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणुक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहीती किंवा तत्संबंधी काही माहीती कोणत्याही कारणासाठी पुर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा, स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा स्व:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पठिंबा मिळविणे किंवा दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे. परीक्षा कक्षातील नियंत्रण अधिकारी यांच्याशी अरेरावी करणे, उध्दटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे. अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल. कृषी उत्पन्न बाजार समिती तर्फे घेण्यात येणाऱ्या वेगवेगळया परीक्षेसाठी बसण्यापासुन काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.

४) उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र दिनांक ०८/०१/२०२६ ते दिनांक १०/०१/२०२६ पर्यंत समितीचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत व दिनांक ११/०१/२०२६ ला परीक्षा केंद्रावर सकाळी १०.०० ते ११.३० पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल.

५) वरील सर्व पदाकरीता लेखी परिक्षा दिनांक **११/०१/२०२६** रोजी घेण्यात येणार असुन, परिक्षेचे स्थळ व वेळ प्रवेश पत्रामध्ये नमुद करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया पुर्व सूचना न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.सभापतींनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

**सभापती तथा निवड समिती अध्यक्ष**
कृषि उत्पन्न बाजार समिती, अहेरी